# ज्येष्ठांसाठी ‘प्रतिसाद’ ॲप

## ज्येष्ठांच्या सुरक्षेसाठी सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांची घोषणा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या अडीअडचणीत त्यांना मदतीचा हात देण्यासाठी राज्यभरात ‘प्रतिसाद’ ॲप तयार करण्याचा निर्णय राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष साह्य विभागाने घेतला आहे. लवकरच त्या संदर्भात पावले उचलण्यात येणार आहेत,’ अशी माहिती सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी सोमवारी दिली.

ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त सामाजिक न्याय विभागाच्या वतीने ‘ज्येष्ठोत्सव २०१८’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कला, साहित्य यासह विविध क्षेत्रातील ज्येष्ठ मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, खासदार अनिल शिरोळे, आमदार मेधा कुलकर्णी, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (बार्टी) महासंचालक कैलास कणसे आणि स्थानिक नगरसेवक आदी उपस्थित होते. या ज्येष्ठोत्सवाचे बडोले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. ‘नवी मुंबई शहरात पोलिसांनी ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ‘प्रतिसाद’ मोबाइल ॲप तयार केले आहे. त्या ॲपद्वारे ज्येष्ठ नागरिक आपत्कालीन परिस्थितीत मदत मागू शकतात. त्याद्वारे संबंधितांच्या नातेवाइकांना आणि परिसरातील पोलिसांना त्याची माहिती प्राप्त होते. ही ॲपची योजना राज्यभरात लागू करण्यासाठी राज्य सरकारने मान्यता दिली आहे,’ असे बडोले यांनी या वेळी स्पष्ट केले. तसेच, सामाजिक न्याय विशेष साह्य विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती बडोले यांनी दिली. आमदार मेधा कुलकर्णी यांनी या कार्यक्रमात ‘कोथरूड ज्येष्ठ नागरिक महासंघाची’ घोषणा केली. तसेच, त्याच्या वेबसाइटचे लोकार्पणही करण्यात आले.

ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त शां. ग. महाजन, नलिनी देवधर, शि. द. फडणीस, डॉ. मोहन आगाशे, माधव वझे, दीपा लागू, मनीषा साठे, म. भा. चव्हाण, अरुणा ढेरे, प्रतिभा शाहू मोडक, अभिनंदन थोरात, वसंत म्हस्के, बापू घाटपांडे, अशोक नाफडे, डॉ. विश्वास मेहेंदळे, डॉ. अरविंद संगमनेरकर, मकरंद टिल्लू यांचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला.

अमित रुके



**वयाच्या शंभरीत पोचलेल्या ज्येष्ठ नागरिक नलिनी देवधर यांचा सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आमदार मेधा कुलकर्णी उपस्थित होत्या.**

### कार्यक्रम सरकारचा की पक्षाचा?

‘ज्येष्ठोत्सव २०१८’चे आयोजन सामाजिक न्याय व विशेष साह्य विभागाच्या वतीने करण्यात आले होते. मात्र, विभागाच्या वतीने या कार्यक्रमाची पुरेशा प्रमाणात प्रसिद्धी करण्यात आली नसल्याचे दिसून आले. त्यामुळे शहराच्या कानाकोपऱ्यातील ज्येष्ठ नागरिकांना या उपक्रमाची माहिती मिळाली नाही. त्यामुळे राज्य सरकारचा कार्यक्रम असूनही हा कार्यक्रम एका विशष्ट राजकीय पक्षाचाच कार्यक्रम ठरला. या कार्यक्रमाला उपस्थित वक्त्यांच्या भाषणातही कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत सामाजिक न्याय विभागाचा उल्लेख करण्यात आला नाही. खुद्द सामाजिक न्याय राज्यमंत्र्यांनी आयोजक म्हणून विभागाचा उल्लेख केला नाही. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना याबाबत विचारले असता, हा कार्यक्रम विभागानेच आयोजित केलेला होता. स्थानिक पातळीवरील ज्येष्ठ नागरिक संघांच्या सहयोगाने त्याचे आयोजन केले होते, अशी माहिती देण्यात आली.